8

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** पौड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0066 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**21/02/2026 08:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 20/02/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 20/02/2026
**Time From (वेळेपासून):** 14:34 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:39 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 21/02/2026 **Time (वेळ):** 07:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 21/02/2026 07:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मौजे पा◌ौड गावचे हददीत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
पौड पोलीस स्टेशन

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रशांत रामचंद्र चौगुले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,सोलापुर ,पौड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,सोलापुर ,पौड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9823225465

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन बाळासाहेब शिंदे | | | 1. फ्लट नं 409,ग्रीन फ्लोरन्सीया सोसायटी,सुसगांव तामुळशी जिपुणे,पौड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
पौड पोलीस स्टेशन

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद तारीख 21.02.2026

मी प्रशांत रामचंद्र चौगुले ,वय-43 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग सोलापुर मो.नं.9823225465

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग सोलापुर येथे पोलीस उप अधिक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि.17/02/2026 रोजी आम्ही आमचे कार्यालयात उपस्थित असताना आमचे पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र यांनी आम्हास फोन द्वारे कळविले की तक्रारदार श्री. संदीप बाळासाहेब नरोडे वय. 45 वर्षे, व्यवसाय- इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर रा. 101, स्मती हाईटस विद्यानगर, कात्रज- मुंडवा रोड, कात्रज पुणे यांनी लाच मागणी होत असले बाबतची तक्रार सांगितलेली आहे. सदर तक्रारदार यांना त्यांचे राहते गावी पुणे येथे भेटुन त्यांची तक्रार ऐकुण घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित करुन तक्रारदार यांचा मोबाईल क्रमांक दिला व ते पुणे येथे दिनाक 18.02.2026 रोजी भेटतील असे सांगितले. त्यांनतर आम्ही लागलीच मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका, सोलापुर यांना दिनाक 18.02.2026 रोजी सकाळी 07.00 वाजता पंच हजर राहणेकामी पत्र व्यवहार केला. त्यांनतर दिनाक 18.02.2026 रोजी सकाळी 07.00 वा.चे सुमारास पंच 1) श्री. सौरभ सुनिल क्षिरसागर वय-26 वर्षे व्यवसाय -नोकरी पद- कनिष्ठ अभिंयता सहाय्यक, महानगर पालीका सोलापूर , रा.बी-64 रा.व्दारका नगरी,विजापूर रोड,सोलापूर 2. श्री.ओंकार नेताजी शिंदे ,वय -25 वर्षे व्यवसाय – कनिष्ठ अभिंयता सहाय्यक, महानगर पालीका सोलापूर रा. ई-27 142 ए रामचंद्रप्पा शेटे नगर लक्ष्मी पेठ, सोलापूर असे लाचलुचपत प्रतिंबधक विभाग,सोलापुर येथे आमचे कक्षात हजर झाले. त्यांनंतर आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, तक्रारदार यांनी कासारअंबोली,पुणे येथे बोलावले असल्याचे सांगुन पोहवा/ शिरीषकुमार सोनवणे,पोहवा/श्रीराम घुगे, पोशि/राजु पवार,दोन्ही पंच असे सरकारी वाहन क्रमांक एमएच 12 युसी 4098 या चारचाकी वाहनाने पडताळणी व सापळा कारवाईकरीता लागणारे आवश्यक साहित्या घेवून सोलापुर लाप्रवि कार्यालय येथुन सकाळी 07.30 वा.चे सुमारास रवाना होऊन मोहोळ-इंदापुर-कात्रज मार्गे कासारअंबोली गाव येथे मामासाहेब मोहोळ मेमोरीयल स्कुल समोर रोडवर पोहोचलो ती वेळ 13.00 वा. ची होती. सदर ठिकाणी तक्रारदार उपस्थित होते. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली व घेतली.

त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. संदीप बाळासाहेब नरोडे यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. सौरभ सुनिल क्षिरसागर पंच क्र.2 म्हणून श्री.ओंकार नेताजी शिंदे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

श्री. संदीप बाळासाहेब नरोडे वय. 45 वर्षे, व्यवसाय- इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर रा. 101, स्मती हाईटस विद्यानगर, कात्रज- मुंडवा रोड, कात्रज पुणे मो.क्र.9370546868 " वरील विषयास अनुसरुन सविनय सादर की, माझे विरुध्द पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे गु.र.न. 50/2026 बी.एन.एस. कलम 189, 190(1), 191 (2), 194(1), 194 (2), 115, 352(2), 351(2),281, 324 (4) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस सचिन शिंदे हे करीत आहेत.

दिंनाक 13.02.2025 रोजी पोलीस सचिन शिंदे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 7517613789 वरुन माझ्या मोबाईल क्रमांकावर फोन आला त्यावेळी त्यांनी मला माझे आधारकार्ड, दोन फोटो व माझी फोच्र्युनर कार क्रमांक एम.एच.12.जे. के. 0011 हया गाडीचे कागदपत्र घेवुन पौड पोलीस ठाणे येथे येण्यास सांगीतले. त्यावरुन मी दिंनाक 15.02.2026 रोजी पौड पोलीस ठाणे, येथे जावुन वर नमुद कागदपत्र पोलीस सचिन शिंदे यांना भेटून



पोलीस निरीक्षक
पौड पोलीस स्टेशन

दिली. त्यावेळी पोलीस सचिन शिंदे यांनी त्यांचेकडील नोटीसवर माझी सही घेतली. त्यांनतर त्यांनी माझी फोर्च्युनर कार पोलीस ठाण्यात घेवून येण्यास सांगीतले. सदर वेळी पोलीस ठाण्याच्या पोर्चमध्ये चर्चा करीत असताना पोलीस सचिन शिंदे यांनी मला तुमचे विरुध्द दाखल गुन्हयामध्ये आर्म अॅक्ट कलम वाढ न करणेसाठी व फोर्च्युनर कार जप्त न करणेसाठी एक लाख रुपये द्यावे लागतील, असे म्हणाले. पोलीस सचिन शिंदे यांनी माझ्याकडे मागणी केलेले एक लाख रुपये हे कोणतीही शासकीय फी नसुन ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. आज दिंनाक 18.02.2026 रोजी मी पोलीस सचिन शिंदे यांची भेट घेणार आहे त्यांचेत व माझेत कोणतेही पैश्याचा देवाण घेवाणचा व्यवहार नाही किंवा त्यांचेत व माझेत भांडण तंटा नाही.

तरी पोलीस सचिन शिंदे यांनी माझ्याकडे एक लाख रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विंनती आहे."वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.नरोडे यांना नमूद लोकसेवक पोलीस सचिन शिंदे यांनी कधी व कुठे भेटण्यास बोलाविले आहे अशी विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस सचिन शिंदे यांनी पौड पोलीस स्टेशन येथे बोलावले असुन येण्यापुर्वी फोन करुन येण्यास सांगितले आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.नरोडे यांचेकडे लोकसेवक सचिन शिंदे हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे आम्ही ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र.1 म्हणून सौरभ सुनिल क्षिरसागर, पंच क्र. 2 म्हणून ओंकार शिंदे हे काम पाहतील, असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 व क्र.02 यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये कज्ग् कंपनीचे नवीन सिलबद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढले त्याचे वर्णन पाहता ते EVM कंपनीचे 8 जी.बी. चे मेमरीकार्ड दाखवले त्याचे वर्णन पुढील बाजूस EVM 8 GB micro SD 10 I 1 HC मागील बाजुस CE MM 8GC10AX 6D -194 XQH 250120 SM MADE IN TAIWAN EVMTF/8GB 0225 SE असे असल्याचे दिसुन आले. ते मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. त्यानंतर तक्रारदार नरोडे व पंच क्र.1 क्षिरसागर पंच क्र.02 शिंदे यांचे पडताळणी निवेदन घेतले. ती वेळ 13.42 वा ची होती. सदरचे निवदेनाचे सॅमसंग कंपनीचे Galaxy A065G या मोबाईलमध्ये एक नवीन सिलबद मेमरी कार्ड घालुन व्हिडीओ त्याचे चित्रीकरण केले. त्यावेळी व्हाईसरेकॉर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत केलेले निवेदन हे सदर मेमरी कार्डमध्ये फाईल नंबर 01 वर ध्वनिमुद्रित झाले असलेबाबत माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार श्री.नरोडे यांना पोलीस सचिन शिंदे हे कोठे भेटतील याकरीता तक्रारदार यांचे नमुद मोबाईल वरुन पोलीस सचिन शिंदे यांचे नमुद मोबाईल क्रमांकवर फोन करण्याचे ठरविले. त्यानंतर तक्रारदार नरोडे यांना त्यांचा मोबाईलचा स्पिकर ऑन करुन बोलणे करावे, अशा सुचना आम्ही दोन्ही पंचासमक्ष दिल्या. त्यानंतर तक्रारदार नरोडे यांनी त्यांच्या मोबाईल क्र. 9370546868 वरुन पोलीस सचिन शिंदे यांचा मो. नं. 7517613789 वर 13.45 वाजता फोन करुन स्पिकर ऑन केला, त्याच वेळी आम्ही आमचेकडील व्हॉईसरेकॉर्डर चालु करून त्याचे रेकॉर्डींग बटन ऑन केले. त्यावेळी तक्रारदार व पलीकडून बोलणारा इसम यांनी तक्रारदार यांचा मोबाईल फोन उचलला नाही. सदरचा कॉल हा सदर मेमरीकार्डमध्ये फाईल क्र.02 वर ध्वनीमुद्रीत झाले असलेबाबत माहिती दिली. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांचे मोबाईलवर 7517613789 या क्रमांकावरुन फोन आला, त्यावेळी तक्रारदार यांनी पोलीस सचिन शिंदे यांचा फोन आला आहे, असे सांगितले. त्यावेळी मी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु केला व त्यानंतर तक्रारदार यांना आलेला फोन मोबाईल स्पिकर ऑन करुन उचलला. त्यावेळी पलीकडून बोलणारा इसम व तक्रारदार यांचेमध्ये संभाषण झाले. सदरचे संभाषण हे स्पिकर ऑन असल्याने आम्ही पंचासमक्ष ऐकले. त्यानंतर मी व्हॉईस रेकॉर्डरचे रेकॉर्डींग बंद केले. त्यामध्ये तक्रारदार नरोडे यांनी पोलीस शिंदे यांना पोलीस स्टेशनला आहात का असे विचारले असता पोलीस शिंदे यांनी जुन्नरला निघाले असल्याचे सांगितले त्यांनी 20 तारखेला या असे तक्रारदार नरोडे यांना सांगितले त्यावर नरोडे यांनी विषय मिटवण्यासाठी उद्या भेट होईल का अशी विचारणा केली असता पोलीस शिंदे यांनी उद्या दुपानंतर फोन करा असे असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावेळी व्हाईसरेकॉर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत केलेले संभाषण हे सदर मेमरी कार्डमध्ये फाईल नंबर 03 वर ध्वनिमुद्रित झाले असलेबाबत माहिती दिली.

त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक सचिन शिंदे हे यांची भेट दिंनाक 18.02.2026 रोजी होणार नसल्याचे स्पष्ट झाले. त्यांनतर मी तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत गोपनीयता राखण्याची सुचना देवून दिंनाक 20.02.2026 रोजी 13.00 वाजण्याच्या सुमारास सापळा पथक व पंचासह येतो, असे सांगितले. व पंचांनाही त्याबाबत सांगितले. त्यानंतर सदरची लाच मागणी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करून सापळा पथक व



पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
पौड पोलीस स्टेशन

पंचासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर कडे रवाना झालो. तेथे जावुन दिनांक 18.02.2026 रोजीचा सविस्तर पंचनामा 23.30 वाजता पुर्ण करुन सदर पंचनाम्यावर त्याच दिवशी पंचाच्या दिनांकित सहया घेण्यात आल्या.

ठरल्याप्रमाणे दि.20/02/2026 रोजी आम्ही दोन्ही पंच क्षिरसागर व शिंदे, पोहवा/ 71, शिरीषकुमार सोनवणे, पोहवा/ 1749, श्रीराम घुगे, पोशि/ 1368, राठोड चालक पोशि/2026 श्रीराम असे सरकारी वाहन क्रमांक एमएच 12 युसी 4098 या मधुन सापळा पथक आवश्यक साहीत्यासह सोलापुर लाप्रवि कार्यालय येथुन सकाळी 07.00 वाजता रवाना होऊन मोहोळ-इंदापुर-कात्रज मार्गे तक्रारदार यांनी सांगितलेप्रमाणे कासारअंबोली ता.मुळशी जि.पुणे येथे मामासाहेब मोहोळ मेमोरीयल स्कुल समोर रोडवर दुपारी 13.00 वाजता पोहोचलो. त्या ठिकाणी तक्रारदार हे उपस्थित होते. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी तक्रारदार यांना पंच क्र.01 क्षिरसागर यांचेसह शासकीय रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार नरोडे यांचे कमरेला पॅन्टमध्ये लाऊन देऊन पडताळणीकामी पौड पोलीस स्टेशन येथे पाठवण्याचे ठरवले. त्यानंतर यापुर्वी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड तात्पुरते खाकी पाकीटात सिंलबद करुन सुरक्षितरीत्या ठेवले होते. सदर सिंलबद खाकी पाकीटातील मेमरीकार्ड पंचासमक्ष बाहेर काढुन सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये यापुर्वी ध्वनीमुद्रीत झालेल्या रेकॉर्डीग फाईल सुरक्षीत असल्याची तक्रारदार, पंच व सापळा पथकास खात्री करुन दिली. त्यानंतर तक्रारदार श्री.नरोडे व पंच क्र.1 क्षिरसागर व पंच क्र.02 शिंदे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 13.15 वा ची होती. सदरचे निवदेनाचे सॅमसंग कंपनीचे क्रडुथ्डुन्त्र् ऋ065क्र या मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. सदर निवेदन मेमरी कार्डमध्ये फाईल नंबर 04 वर ध्वनिमुद्रित झाले असलेबाबत माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार श्री.नरोडे यांना पोलीस सचिन शिंदे हे कोठे भेटतील याकरीता तक्रारदार यांचे मोबाईल वरुन पोलीस सचिन शिंदे यांचे मोबाईल फोन करण्याचे ठरविले. त्यानंतर तक्रारदार नरोडे यांना त्यांचा मोबाईलचा स्पिकर ऑन करुन बोलणे करावे, अशा सुचना आम्ही दोन्ही पंचांसमक्ष दिल्या. त्यानंतर तक्रारदार नरोडे यांनी त्यांच्या मोबाईल क्र. 9370546868 वरुन पोलीस सचिन शिंदे यांचा मो. नं. 7517613789 वर 13.21 वाजता फोन करुन स्पिकर ऑन केला, त्याच वेळी आम्ही आमचेकडील व्हॉईसरेकॉर्डर चालु करून त्याचे रेकॉर्डीग बटन ऑन केले. त्यावेळी पलीकडून बोलणारा इसम व तक्रादार यांचेमध्ये संभाषण झाले. सदरचे संभाषण हे स्पिकर ऑन असल्याने आम्ही पंचासमक्ष ऐकले. त्यानंतर मी व्हॉईस रेकॉर्डरचे रेकॉर्डीग बंद केले. त्यावेळी तक्रारदार नरोडे यांनी पोलीस शिंदे यांना पोलीस स्टेशनला आहे का असे विचारणा केली असता पोलीस शिंदे यंानी पोलीस स्टेशनमध्ये असुन पोलीस स्टेशनला येण्यास संागितले. त्यावेळी तक्रारदार नरोडे यांनी 15-20 मिनीटांमध्ये येतो असे सांगितले. त्यावेळी व्हाईसरेकॉर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत केलेले संभाषण हे सदर मेमरी कार्डमध्ये फाईल नंबर 05 वर ध्वनिमुद्रित झाले असलेबाबत माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांना पोलीस ठाणे कोठे आहे त्यावेळी तक्रारदार यांनी 7 ते 8 कि.मी लांब असल्याचे सांगितले. त्यामुळे 14.15 वा. कासारअंबोली या ठिकाणाहुन तक्रारदार व आम्ही सापळा पथक व पंचांसह रवाना झालो व पौड पोलीस ठाणे पासुन अलीकडे गडदावणे फाटा ता.मुळशी जि.पुणे येथे आलो. त्यावेळी 14.25 वाजले होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच यांना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो आम्ही तक्रारदार श्री.नरोडे यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे आतील बाजुस कमरेला काळ्या दो-याचे सहाय्याने लटकावुन लावुन दिला. त्यानंतर तक्रारदार नरोडे यांना पंच क्र.01.क्षिरसागर यांचेसह 14.34 वा पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील चारचाकी एम एच 12 जेके 0011 मधुन गडदावणे फाटा येथुन रवाना केले व आम्ही,सापळा पथक व पंच क्र.2 शिंदे यांचेसह सदर ठिकाणी शासकीय वाहनात थांबुन राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 क्षिरसागर असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे पॅन्टचे आतील बाजुस कमरेला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. ती वेळ 15.39 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.01 क्षिरसागर यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, " मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील चारचाकी एम एच 12 जेके 0011 मधुन पौड पोलीस स्टेशनकडे गेलो. तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन रोडचे कडेला पार्कीग करुन पौड पोलीस स्टेशनमध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी तेथे असलेल्या एका पोलीसाला शिंदे साहेब हायत का असे विचारले असता त्या पोलीसाने कोणते शिंदे साहेब अशी विचारणा केली असता तक्रारदार नरोडे यांनी सचिन शिंदे साहेब आहेत का असे विचारले. त्यावेळी त्या पोलीसाने शिंदे साहेब पोलीस स्टेशनच्या पाठीमागे बसल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही मागे गेलो असता तेथे असलेल्या एका व्यक्तीला तक्रारदार नरोडे यांनी सचिन शिंदे साहेब आहेत का अशी विचारणा केली असता त्या व्यक्तीने हाताने इशारा करुन मुळशी बीट अंमलदार ऑफिस असा बोर्ड लावलेल्या खोलीकडे इशारा केला. त्यानंतर तक्रारदार नरोडे व मी असे मुळशी बीट अंमलदार ऑफिस असा बोर्ड असलेल्या



पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
पौड पोलीस स्टेशन

खोलीचे बाहेर दरवाज्यासमोर उभे राहिलो असता खोलीमध्ये साध्या वेशात एक व्यक्ती बसल्याचे आम्हाला दिसले. त्यावेळी तक्रारदार नरोडे यांनी मला इशारा करुन ती व्यक्ती पोलीस सचिन शिंदे असल्याचा इशारा केला. त्यावेळी पोलीस सचिन शिंदे यांनी तक्रारदार नरोडे यांना पाहुन खुर्चीतुन उठुन खोलीचे बाहेर आले. त्यावेळी तक्रारदार नरोडे व पोलीस सचिन शिंदे हे चर्चा करीत असताना पोलीस सचिन शिंदे यांनी माझ्याकडे बोटाने इशारा करुन तक्रारदार नरोडे यांना हे कोण आहेत विचारले असता तक्रारदार यांनी त्यांचा भाचा असल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस सचिन शिंदे यांनी मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यामुळे मी तक्रारदार नरोडे व पोलीस सचिन शिंदे हे मला दिसतील व त्ंाचेमध्ये होत असलेले बोलणे ऐकु येईल अशा ठिकाणी पोलीस ठाणे आवार पार्किंगमध्ये थांबुन राहिलो. सदर चर्चेदरम्यान तक्रारदार नरोडे हे आलोसे शिंदे यांना भेटले त्यावेळी आलोसे शिंदे या...असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे हे बापरे... तिकडून इकड लय पळवल आम्हाला. शुज काढू का असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे हा.. तिकडच येत होतो मी..असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे थांबु का बाहेरच असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे हा दोन मिनट बसा असे म्हणाले त्यावर तक्रारदार हा..असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे या साहेब.. पेपर आणलेत का..असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे यांनी दुस-या गाडीत आहेत असे सांगितले त्यावर आलोसे शिंदे या इकड जे ते सगळच करतेत.. तुम्ही बोला मी बोललो त्या ती दिवशी तुमचे वकिल साहेब ते बोलाय लागले आपुन कस बोलायच... म्हणल जाउदे त्यावर तक्रारदार नरोडे साहेब खर सांगु मी मदत करायला गेलो होते काय सांगु मी.. मदत करायला तिथ आले काही संबध नाही.. माझ्या मुलाच्या एवढा पोरगा आहे तो. त्याला मी एकही शिवी दिली नाही. प्रेमाने संागत होतो सायबाच्या मागन अन. चला म्हणल साहेब..मी बोललो चला म्हणल साहेब आणि मी एक बोललो होतो एक लाख रुपये देतो..असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे हं. मग किती दयायच..असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे आई शपत सांगतो....असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे असे म्हणाले कि आज मला बोलावल होत.. पी.आय साहेबाने  असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे आमचे बाकीचे आहेत ना आशोक सोडुन बाकीचे आहे सगळे आहेत सांगतेत बाकीच्या कुणाला काही फरक पडत नाही. विषय फक्त माझच आहे. अन मग काय होईल तुम्ही मला फोन केला रातन गेल तर खोट सांगत नाही की बाबा.. मग तुम्ही आमच अनादर करायच नाही.. आहो साहेब मला स्वप्नात पण वाटल नाही की माझ्यावर फक्त आरोप आहेत ते असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे मग काय बोलले ते.. काय म्हणण आहे त्यात असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे त्या दिवशी ते दहा हजार म्हणलात त्यावर आलोसे शिंदे तुम्ही हे करुन या...  असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे भाचा आहे माझा.. त्यावर आलोसे शिंदे दोन मिनिटच फक्त..असे म्हणुन पंच नं .01 यास बाहेर थांबण्यास सांगितले.त्यावेळी पंच नं.01 हे तक्रारदार नरोडे व आलोसे शिंदे यांचे संभाषण ऐकु येईल असे दरवाज्याजवळ थांबले. त्यावेळी तक्रारदार नरोडे व आलोसे शिंदे हे यांनी इतर संभाषण करुन ते पेपर दया मला.. पेपर लागतीनच तुम्ही किती जरी काय केल तरी असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे टु व्हीलरचे आणलेत ना ...असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे  ते पण तुमच्याकड नाहीत ... पेपर तर दया की काय हरकत आहे. प्रीन्ट काढतो आजुन काय आणखी असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे येवडी ट्राफिक रोडला.. लई बेकार जाम पिंरगुट चैाक वाडजे सगळ जाम आहे. तुम्ही बोला न काय करायच असे म्हणुन पंचवीस असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे निम्मतर करा ह का ..असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे बर तीस हजार एकदम परफेक्ट आहे. आता काय बोलु नका तुम्ही असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे पाच वाढवा चला.... जाउदया पाच वाढवा बास...असे म्हणाले त्यावर तक्रारदार नरोडे किती होतात पुर्ण... असे म्हणाले त्यावर आलोसे शिंदे पस्तीस करा चला...असे म्हणाले त्यावर तक्रारदार पस्तीस हजार रुपये असे म्हणाल त्यावर आलोसे शिंदे हा बस.. तो बाप येईपर्यंत काय करायच आहे ते करा असे म्हणाले व त्यानंतर तक्रारदार व आलोसे शिंदे यांनी गुन्हयाबाबत चर्चा करुन तक्रारदार नरोडे येतो मग मागन मी.. पुन्हा फोन करतो मी असे म्हणुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी व्हाईसरेकॉर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत केलेले संभाषण हे सदर मेमरी कार्डमध्ये फाईल नंबर 06 वर ध्वनिमुद्रित झाले असलेबाबत पंचांना माहिती दिली.

त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर तक्रारदार श्री.नरोडे यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले, याबाबत विचारणा केली असता, पंच क्र.01 क्षिरसागर यांनी सांगितलेनुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर मी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून मुद्देसुद ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार श्री. संदीप बाळासाहेब नरोडे वय. 45 वर्षे, व्यवसाय- इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर रा. 101, स्मती हाईटस विद्यानगर, कात्रज- मुंडवा रोड, कात्रज पुणे यांनी दि.18.02.2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.20.02.2026 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे विरुध्द पौड पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयामध्ये आर्म अॅक्ट कलम वाढ न करणसाठी व फोच्र्युनर कार जप्त न करणेसाठी, तक्रारदाराकडे एक



पोलीस निरीक्षक

लाख रुपयाची लाच मागणी करुन तडजोडीअंती 35000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की पोलीस शिंदे यांनी मागणी केलेली लाच रक्कम आजच पोलीस स्टेशनला घेऊन येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार नरोडे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरु करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार नरोडे यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 35000/- रुपये हजर केले.त्यानंतर पोशि/1368 राठोड यांनी नमुद नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले. तक्रारदार नरोडे व पंचांना अॅंथ्रासिन पावडरची तसेच अल्ट्राव्हायलेट दिव्याची माहिती व गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर तक्रारदार , पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस शिंदे यांनी लाच रक्कम स्विकारल्यास तक्रारदार किंवा पंच हे मला माझे मोबाईल फोनवर फोन करुन कळवतील असे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेला चापोशि/श्रीराम यांनी अॅंथ्रासिन पावडर लावुन घेतली. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाचेची रक्कम रुपये 35000/- रुपये चापोशि/श्रीराम यांनी तक्रारदार यांच्या नेसणीस असलेल्या निळया रंगाची जिन्स पॅन्टच्या पुढील बाजुच्या उजवे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर चापोशि/श्रीराम यांना सापळा कारवाईमधुन वगळण्यात आले.
त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण मोबाईल मध्ये टाकलेल्या मेमरीकार्ड मध्ये करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर सापळा कारवाईकरीता आमचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये सिलबद नवीन मेमरीकार्ड टाकुन ते चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार नरोडे त्यानंतर पंच क्र.01 श्री.क्षिरसागर व पंच क्र.02 शिंदे यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 16.57 वा ची होती. सदर निवेदनाचे मोबाईलव्दारे व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद केले ती वेळी 16.59 वा.ची होती. त्यावेळी व्हाईसरेकॉर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत केलेले निवदेन हे सदर मेमरी कार्डमध्ये फाईल नंबर 01 वर ध्वनिमुद्रित झाले असलेबाबत माहिती दिली. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.

त्यानंतर पोलीस शिंदे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना पंच क्र.01 क्षिरसागर यांचेसह पौड पोलीस स्टेशन येथे तक्रारदार यांचे चारचाकी वाहन क्र.एमएच 12 जेके 0011 या मधुन पाठविणेचे ठरले व पंच क्र.02 शिंदे, सापळा पथक असे असे शासकिय वाहनामधुन तक्रारदार यांचे वाहनामागे रवाना होतील असे ठरविले.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार नरोडे यांनी परीधान केलेल्या पॅन्टचे आतील आजुस कमरेला आत लाऊन देऊन तक्रारदार नरोडे यांना पंच क्र.01 क्षिरसागर यांचे सह 17.04 वा.चे सुमारास त्यांचे चारचाकी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.02 शिंदे व सापळा पथक असे शासकिय वाहनामधुन पौड पोलीस स्टेशन पासुन थोडया-थोडया अंतरावर कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबुन राहीलो. त्यानंतर 17.38 वा चे सुमारास तक्रारदार नरोडे यांनी ठरल्याप्रमाणे आमचे मोबाईलवर व्हॉट्सअप व्दारे फोन करुन पोलीस शिंदे यांनी लाच रकमेचा स्विकार केल्याचे संागीतले. त्यामुळे आम्ही, पंच क्र.02 शिंदे व सापळा पथक असे पोलीस शिंदे बसलेल्या मुळशी बीट अंमलदार ऑफिस असा बोर्ड लावलेल्या खोलीत गेलो व त्या ठिकाणी खुर्चीमध्ये बसलेल्या पोलीस शिंदे यांना सापळा पथकाचे मदतीने आम्ही पंचांसमक्ष ताब्यात घेतले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 17.39 वा ची होती. त्याचवेळी आम्ही व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. व पंचासमक्ष ताब्यात घेतलेल्या व्यक्तीस त्यांचे नांव विचारले असता त्यंानी त्यंाचे नंाव सचिन बाळासाहेब शिंदे,वय.45 वर्षे,पद-सहा.पोलीस उपनिरीक्षक,नेमणुक-पौड पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण सध्या राहणार-फ्लॅट नं 409,ग्रीन फ्लोरन्सीया सोसायटी,सुसगांव ता.मुळशी जि.पुणे असे सांगितले. त्यानंतर पंच क्षिरसागर यांना पोलीस शिंदे यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता पंच क्षिरसागर यांनी सांगितले की, पोलीस शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेली लाच रक्कम ही त्यांचे समोरील टेबलचे उजवे बाजुचे ड्रॉवरमध्ये ठेवल्याचे सांगितले. त्याचवेळी सदरची लाच रक्कम ही सहा.पो.फौ/ सचिन शिंदे यांनी काढुन टेबलावर ठेवली. त्यानंतर खोलीतील लाईट बंद करुन अल्ट्राव्हायलेट टॉर्चच्या प्रकाशात सदर लाच रक्कमेची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता लाचेची रक्कमेवर निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर आम्ही पंच क्र.02 आंेकार शिंदे यांना सहा.पो.फौ/ शिंदे यांनी काढुन दिलेल्या लाच रकमेतील नोटांचे नंबर आणि पंच क्र.02 आंेकार शिंदे यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच



पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
पौड पोलीस स्टेशन

आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले त्याप्रमाणे पंच क्र.02 ओंकार शिंदे यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले व सदर लाच रक्कम मोजुन पाहीली असता ती 35000/- रुपये असल्याचे आढळुन आली. त्यानंतर सहा.पो.फौ/ सचिन शिंदे यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता सहा.पो.फौ/ सचिन शिंदे यांचे उजवे हातास पुढील बाजुस ,बोटांच्या पे-यावर निळसर चकाकी दिसुन आली. तसेच लाच रक्कम ठेवलेला टेबलाचा ड्रॉवर अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये तपासला असता ड्रावरमध्ये असणा-या तपकिरी रंगाची डायरीवर ज्याच्यावर 2026, ग्ड.चक्रवक्तक्ष्‌ च्क्षक्ष्क्क घ्‌ख्रक्षक्ष छ्ए क्षच्घ्क्वच्ग्ड असे नेमप्लेट चिकटवलेली आहे त्यावर अॅन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांचे दोन्ही हातसही अॅन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदरची स्विकारलेली लाच रक्कम तात्पुरत्या स्वरुपात पंच नं .02 ओंकार शिंदे यांच्या ताब्यात देण्यात आली.त्यानंतर व्हिडीओ रेकॉर्डीग बंद करण्यात आले.त्यावेळी 17.45.वाजले होते.

त्यानंतर सापळा कारवाईमधील नमुद तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गु.र.नं.50/ 2026 चे कागदपत्रे सहा.पो.फौ/ सचिन शिंदे यांचेकडुन पंचांसमक्ष हस्तगत केली. त्यानंतर सहा.पो.फौ/ सचिन शिंदे यांचेवर सापळा कारवाई झाले असलेबाबत त्यांचे वरीष्ठ अधिकारी श्री.संतोष गिरीगोसावी,पोलीस निरीक्षक यांना त्यांचे मोबाईलवर फोन करुन सांगितले.तसेच पौड पोलीस स्टेशनचे दुय्यम अधिकारी स.पो.नि/संदीप मनोहरराव चव्हाण यांना समक्ष बोलावुन घेवून सांगितले. त्यानंतर पौड पोलीस स्टेशन येथील जागेच्या अभावामुळे पुढील कारवाई करीता टाटा विश्रामगृह,माले ता.मुळशी जि.पुणे येथे जागा उपलब्ध करुन घेतली. त्यानंतर आलोसे सहा.पो.फौ/ सचिन शिंदे यांना घेवून आम्ही,सापळा पथक व पंचांसह टाटा विश्रामगृह येथे आलो. त्यानंतर लागलीच सापळा पथकचे मदतीने मोबाईलमधील व्हिडीओ रेकॉर्डीग सुरु करुन आलोसे सहा.पो.फौ/ सचिन शिंदे यांची अंगझडती घेतली. व त्यानंतर मोबाईल व्हिडीओ रेकॉर्डीग बंद केले.त्यानंतर पंच क्र.01 यांना सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार नरोडे व स.पो.फौ.सचिन शिंदे यांचे भेटी घेतली त्यावेळी झालेले संभाषण आम्हा व पंच क्र.02 यांना विचारले असता त्यांनी सांगितले कि, मी व तक्रारदार असे पौड पोलीस ठाणे आवार पार्किगमधील पौड पोलीस स्टेशन अंकित मुळशी बीट ऑफिस असा बोर्ड असलेल्या खोलीत गेलो त्याठिकाणी तक्रारदार नरोडे हे पोलीस शिंदे यांचेशी चर्चा त्यांचेविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाबाबत चर्चा केली त्या चर्चेदरम्यान आलोसे यानी लाच रक्कमेबाबत हाताने उजवे हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन इशारा केला त्यावेळी तक्रारदार यांनी मान हलवुन होकार देवून लाचेची रक्कम उजवे हाताने पॅन्टचे पुढील उजवे बाजूचे खिशातुन काढुन आलोसे सचिन शिंदे यांचे समोर धरुन पैसे आले पुर्ण असे म्हणाले असता आलोसे सचिन शिंदे हे हासुन लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन त्यांचेसमोरील टेबलचे उजवे बाजूचे ड्रॉवरमध्ये ठेवली अशी हकिकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांना सापळा कारवाई मध्ये पोलीस सचिन शिंदे यांचे भेट घेतली त्यावेळी काय संभाषण झाले याबाबत विचारले असता त्यांनी देखील पंच नं.01 क्षिरसागर यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली. तक्रारदार व पोलीस सचिन शिंदे यांचे चर्चेदरम्यान त्यावेळी व्हाईसरेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केलेले संभाषण हे सदर मेमरी कार्डमध्ये फाईल नंबर 02 वर ध्वनिमुद्रित झाले असलेबाबत पंचांना माहिती दिली.

तरी तक्रारदार श्री. संदीप बाळासाहेब नरोडे वय. 45 वर्षे, व्यवसाय- इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर रा. 101, स्मती हाईटस विद्यानगर, कात्रज- मुंडवा रोड, कात्रज पुणे यांनी दि.18.02.2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.20.02.2026 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचविरुध्द पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे गु.र.न. 50/2026 या दाखल गुन्हयामध्ये आर्म अॅक्ट कलम वाढ न करणसाठी व फोर्च्युनर कार जप्त न करणेसाठी, तक्रारदार यांचेकडे एक लाख रुपयाची लाच मागणी करुन तडजोडीअंती 35000/- रुपये स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी सचिन बाळासाहेब शिंदे,वय.45 वर्षे,पद-सहा.पोलीस उपनिरीक्षक,नेमणुक-पौड पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण सध्या राहणार-फ्लॅट नं 409,ग्रीन फ्लोरन्सीया सोसायटी,सुसगांव ता.मुळशी जि.पुणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिंयाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिंयादी जबाब दिला....

पोलीस निरीक्षक
पौड पोलीस स्टेशन

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH DATTATRAY GIRIGOSAVI(I (Inspector)) / PBMAH73281 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

21/2/26

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH DATTATR

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMAH73281

पोलीस ठाणे अंमलदार
पौड पोलीस स्टेशन

पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
पौड पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
पौड पोलीस स्टेशन